म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९३८८



REFBK-0009407
REFBK-0009407

# अग्निवीणा

वि. म. कुलकर्णी

# आ श्वि नी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 23066 वि: 3104
क्रमांक 9399 नों दि: 22/3/54

वि. म. कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
वा. क्र. 6404

REFBK-0009407
REFBK-0009407

किंमत रुपये २·७५

व्हीनस प्रकाशन : पुणें

● प्रथमावृत्ति : १९५७

● सर्वाधिकार प्रकाशकांचे स्वाधीन

● या पुस्तकांतील कविता म्हणणें,
छापणें इत्यादि हक्क लेखकाकडे

● मुखपृष्ठ
**दीनानाथ दलाल**

● प्रकाशक
**स. कृ. पाध्ये**
व्हीनस प्रकाशन
४१० शनवार पेठ : पुणें २

● मुद्रक
**चिं. ग. वझे**
साधना प्रेस
३७४ शनवार पेठ : पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलक्रम
अनुक्रम 23041 वि: ३।८५
क्रमांक 2300 नों दि: २०।३।

• • •

— साधारणतः गेल्या पांच वर्षांत ( १९५२ – ५७ ) लिहिलेल्या कवितांतील कांहीं कवितांचा हा संग्रह. माझ्या मनाला या कवितांनीं सहज संतोष दिला, तसा सहृदय रसिकांनाहि लाभला तर मला आनंद वाटेल.

माझे स्नेही, व्हीनस प्रकाशनचे संचालक श्री. स. कृ. पाध्ये यांनीं प्रकाशनाचें मनावर घेतलें; त्यांचे, चित्रकर्ते श्री. दलाल यांचे व माझ्या प्रेमळ सुहृदांचे मनःपूर्वक आभार मानतों.

दयानंद कॉलेज, सोलापूर : ७।९।५७

वि. म. कुलकर्णी

## वि. म. कुलकर्णी यांची कविता

- विसर्जन
- पहांटवारा
- कमळवेल
- आश्विनी

बालगीतें :

- छान छान गाणीं
- फुलवेल
- ललकार

सहचारिणी

सौ. कमळ हींस—

# कवितानुक्रम

संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
नों. ता. .../... 
नों. क्र. ...

| | |
|---|---|
| माझी आई | १ |
| कबूतर | २ |
| काळि सांवळी | ३ |
| चालसी पेरीत | ५ |
| चंद्रभागा | ६ |
| स्नान | ७ |
| फिटेल पारणें | १० |
| वळचणीस | ११ |
| एक स्वप्न | १२ |
| शोध | १४ |
| एक एक | १५ |
| एक दिवस असा येतो | १६ |
| संवाद | १८ |
| कुतुबमिनार | २० |
| आरंभ | २२ |
| शरदाची रात्र | २४ |
| एकदां | २५ |
| अबोधाची वाट | २६ |
| कार्तिकाच्या पहाटेला | २७ |
| सुगंध-स्मृति | २८ |
| आतां भरल्या संसारीं | ३० |
| एक अश्रु | ३१ |
| काय लागतें | ३२ |
| किल्मिष | ३३ |
| जातां जातां | ३४ |
| झाडाखालीं | ३५ |
| भिकारीण | ३७ |
| हातीं थरारती काठी | ३८ |
| आठावर ये | ४० |
| भरली पेठ | ४१ |
| कोकणकन्या | ४२ |

गौर ४४
टपटप आला पाऊस ४६
सळसळ ४८
आठवण ४९
गोकुळींचा हरी ५०
रात्रींचा अभ्यास ५२
डोंगरापलीकडे ५४
कितीक दिवसांत ५६
दो बाजूला ऊंसमळा ५७
बालमित्रास ५९
एक कणिका ६१
उद्ध्वस्त वाडा ६२
यात्रा ६४
पाळणा हालतांना ६५
संकष्टीचा चंद्र ६६
नक्षत्रें ६७
जास्वंदी ६८
नदिच्या कांठाला ७०
चढे इमारत ७२
अधीर ७३
कधीं अचानक ७४
हांक ७५
दृष्ट ७७
काय कविवर्य ! ७८
अम्लान फुलांनो ७९
मध्यावरी आलों ८०
आतां ८१
मला आवडे ८२
खेळ ८३
चोखामेळ्याची समाधि ८४
तें रितेंच तीर्थस्थान ८६
आतां लागेल हंसाय ८८

# माझी आई

दा. क्र. ८८४०६

तळ्याकाठीं, सायंकाळीं  उतरत्या उन्हापोटीं
माझ्या आईसारखीच  एक पाहियली मूर्ती !

देवाळयीं कोणासाठीं  काय करून नवस
माता परतली होती  नेत्रीं मायेचा उल्हास...
माझ्या आईसारखीच  तिची पाहतांना मूर्ती
जीव उसळून आला  जसा मासा पाण्यावरती !

असेच ते स्निग्ध डोळे  निर्मळांत खिळलेले
अशाच त्या जिवणीशीं  धार मायेची ओघळे
उंच भाळीं सुरकुती  तिच्या पोटीं लाख दुःखें
तिच्या कायेंतून येतां  ऊन गव्हाळलें होतें !

अहो, आम्हां बाळांसाठीं  तिनें फार कष्ट केले
निज देहाच्या छायेंत  वाळवंटीं सांभाळिलें
तिनें ओढूनिया जातें  भरविले आम्हां घास
रात्र रात्र जागूनिया  तेल घातलें दिव्यास !

पानें फाटलीं केळीचीं  परी केळ उभी होती
अंकुराला काटकीची  काडी धीर देत होती
—माझी आई अशी होती  जशी असतेच आई !
तिच्या उष्ण पान्ह्यासाठीं  कधीं मन जागें होई

सान बाळांच्या मातांत  आतां पाहतों ती मूर्ती
चार भिजल्या क्षणांची  ओवाळितों पंचारती !

# कबूतर

चाळ वाजवित पायांमधले
फिरे कबूतर डौलानें
इवल्या पायां कुणीं चोळिली
न कळे मेंदी घाईनें......

मान ऐटिनें हलवी-डुलवी
पहात चारी बाजूंला
गोल गोल ते छोटे डोळे,
भाव निरागस किति तिथला !

गोजिरवाणेपणा ओंजळिंत
धरुनि सोडिला देवानें
मूर्तिरूप तो इथें वावरे—
कबूतराच्या वेषानें !

मिळेल कण तरि, तोच टिपावा
न मिळे जावें तरि पुढती ;
अशी कशी लाभली कळेना
या पक्षाला मधुवृत्ती !

—मज तर वाटे बनुनि कबूतर
एक दिवस तर हिंडावें,
अन् स्वच्छंदीं, आत्मानंदीं
निर्मळ परिमळ भोगावे !

परि हें जीवन—हें आक्रंदन—
हें निजबंधन सोडीना
चाळ वाजवित पायांमधले
फिरतें जीवन, फिरतें ना !

# कालिसांवळी

मराठी ग्रंथ संग्रहा...
अनुक्रम 23045 दि. ...
क्रमांक 9325 नों. दि. 26...

घाशित बसली—टाच घसघसा
टाकि लावल्या
आं घो ळी च्या
द ग डा व र ती
प्रौढयौवना
कालिसांवळी !

—वेळ उन्हाची
फार गुणाची !

नजर लावुनी
किरण पाहतो
पाठीवरची
पन्हळ तियेच्या...

—शुद्ध न त्याची तिला परंतु
एकच तिचिया मनांत हेतु
टाच निघावी स्वच्छ आपुली !
कुठेंहि कांहीं राहुं नये मळ
स्वच्छ निघो–कीं ओढ्याचा तळ
बालपणामधिं ज्याच्या कांठीं
खडक पाहुनी काळा काळा
टाच घासली होती कितिदां
इवली इवली ऐकत खळखळ !

भंवतींचें मजुरांचें तें जग
आपआपुल्या घाईमध्यें—

डहुळत होतें
विव्हळत होतें
जाग तयाला येतच होती
—रस्ता हळुहळु बोलत होता
पहावयाचें पहात होता !

—अलग जराशी वस्तीपासुन
ही दगडावर बसली होती
टाच घसघसा घाशित होती,
कपारिनें हातांतिल काळ्या...
—वेळ उन्हाची
फार गुणाची !

# चालसी पेरीत

चालसी पेरीत
सोनसळे गहूं,
वारा म्हणे – वाहूं
तरी कसा !

पाठीं सळसळ
नागिणीचा खेळ
कोणीं कसा मेळ
बसवावा !

तूं तुझ्या नादांत
झुलत्या मदांत
एखादा फंदांत
झोके खातो...

तुला तरी त्याची
कोठे म्हणा खन्त,
एखाद्याचा अन्त
झाला तरी !!

—निदान नकोस
पेरूं सोनसळे ;
गुणवंताच्या बाळे,
ऐक जरा !

## चंद्रभागा

पांडुरंगाच्या चरणीं
कुणीं अर्पिली ही माळ,
मध्यें पुंडलीक हिरा
वाटे, करी झळझळ !

नामयाच्या कीर्तनाची
साद येते कानांवर
ज्ञानदेवांचीं पाउलें
उमटलीं तटावर

देवाघरची ही वाळू
तुकोबांची पायधूळ.
भेटे मना जळांतून
जनाईची तळमळ !

महाराष्ट्राची ही गंगा
येथें चंद्ररूप झाली,
वारकऱ्यांची शिदोरी
हिनें नित्य ओलाविली.

इथें तिथें उपेक्षिलीं
हिनें न्हाणिलीं भावंडें,
अभंगाच्या विटेवर
ब्रह्मरूप केलें खडें !

मिठी घालून भेटाया
देव येथें उभा आहे ;
येथें तरतो दगड—
चंद्रभागा साक्ष आहे !

## स्नान

धांवत्या गाडींत
उभा मी दारांत,
धांवतीं झाडें–वाकड्या नद्या
फिरते डोंगर–समोर पहात...

वाऱ्याचा तो झोत
शिटीच्या संगती चढत जाई,
माझें सारें अंग
वाऱ्याच्या झोतांत न्हात राही

समोर सारखे
विश्व नवें नवें
उगवे–मावळे,
मावळे-उगवे !

कोठें कालव्यानें भिजल्या मातीशीं
कुजबुजणारीं चंचल पिकें :
बांधून कमर, मोग्यावरी आणि
ठेवून हात
ओटींचीं बीजें पेरीत पेरीत
कारभाऱ्यामागें उत्सुक धांवती
दिसे कुठें ' लक्ष्मी ' !

मध्येंच डोकावें एखादें गांव
माळरानांतलें फूलच जसें–
गांव–विहिरीशीं
कासरे सोडून घागर नेणारे
दिसती गडी :

वेशींतला चढ हळूं चढणारी
दिसते नारी :
दिसती मुलें
टाळ्या पिटणारीं—
वाऱ्याचा झोत
सारे माझे केस पिस्कारून टाकी,
मला तरी त्याची कुठें म्हणा खंत !

समोर दिसतें—
धांवतें जग,
मध्येंच एखादी
सरळ नदी
वाकडी वाकडी होऊन जाते...
मध्येंच एखादें
जागृत श्वान
इंजिनाच्या संगें
लढाया येतें...

समोर क्षितिज !
समोर धूसर निळेसे डोंगर
कितीक मैलांची विश्वाची छाती
पुढ्यांत कशी उघडीवागडी :
कवळून तिला सरकत येणारा
प्रचंड तो झोत सांगतो मला...
किती माझ्या मनीं
आणिक जीवनीं
आहे रितेपणा
तोच-तो-पणा !

—इवल्या खोल्यांच्या
इवल्या संसारीं
भोगीत राही मी जगांतली सारी
मिरासदारी !
पीठ–मीठ–चहा—
कोळसा–साबण
यांच्यांतच तेथें गुंफलें जीवन,
वेड्यामागें वेढे मनाला देऊन !
मुलांचीं खेळणीं, खेळण्यांचीं मुलें,
तिची पावडर, वेणी आणि फुलें...
—वाऱ्याची बात नाहींच तेथें
तेथें आहे सारी मच्छरदाणी !

आपादमस्तक चाललें स्नान,
वाऱ्यांत एकदां उडालें भान
समोर दिसतीं
धांवतीं झाडें,
चंचल नद्या,
चंचल रानें !

# फिटेल पारणें

भरल्या ढगांना फोडून, बाहेर
येऊं पाहताहे पूर्वेचा चंद्रमा...

डांबरी रस्त्याचे गंभीर दीप
एकाग्र पहाती, दाटली सुषमा.
स्वतःशींच किती बोलत रहाती
वाकुड निंबाचीं पिकलीं पानें,
आठवीत कांहीं श्रावणगाणें...

पाऊस आतांच भेटून गेला
क्षण अचानक तापल्या मातीला
ऊर तिचें जड आलें भारावून
भिरभिर नेत्रीं पाहतें चंचला !

भरल्या रात्रींची निःशब्द शान्ती
व्यापून टाकिते माझें वेडें मन.

आठवतें कांहीं—
आगळें मलाही—
पुस्तकाच्या पानीं दडून राहिल्या
भेटीच्या पहिल्या
नाजूक पिवळ्या
पाकळीसारखें—

आत्म्याला चंद्राचीं भेटती किरणें
वाटतें जन्माचें फिटेल पारणें !

# वळचणीस

वळचणीस माझिया मनाच्या
येउनि बसतें एक पांखरूं;
बसतें-बसतें निवान्त केव्हां,
केव्हां लागे उगा थरथरूं !

दूर देशच्या—दूर तटाच्या
किती कहाण्या सांगे कानीं,
मी गालावर हात ठेवुनी
बघतों ऐकत वेड्यावाणी !

–स्मरतें, स्मरतें मीही केंव्हां
याच्यासंगें भ्रमलों होतों;
काळिज मानुनि हें देहाचें
रक्तहि याचें बनलों होतों...

हेंच पांखरूं, चिवचिवाट हा
जरा कुठेंसा श्रवला होता
तोंच पुराचा लोंढा कोठुनि
दो तीरावर आला होता

जळांत बुडल्या उंच बाभळी
जळांत बुडली बाग केळिची,
जळांत अंधुक दिसतें कांहीं
ती काडी का त्या घरट्याची ?...

वळचणीस माझिया मनाच्या
येउनि बसतें एक पाखरूं;
—धरूं पाहतें काडी चोंचिंत
आणिक लागे उगा थरथरूं!



ग्रंथ संग्रहालय
क्रमांक २३०५६ दि.
९३८ वर्ग

## एक स्वप्न

कृष्णाबाईच्या कांठावर
मला असावें छोटेसें घर
जिथुन बदलतें बघतां पाणी
पर्युत्सुक हें व्हावें अन्तर !

एक एकरी मळा असावा
तिथेंच माझ्या घरास लागुन,
मोट चालली ऐकूं यावी
बैल दिसावे दरवाजांतुन !

उभ्या पिकांवर हिरवा पोपट
कधीं दिसावा जात तरंगत
मोर असावा एखादा अन्
तोही केळींमधुनी नाचत !

—एकतारि ती सोप्यावरती
कोनाड्यामधिं विठ्ठलमूर्ती
चांद विलसतां अस्मानामधिं
टाळ मृदंगासवें बोलती !

टपाल यावें आठवड्यांतुन
बात जगाची थोडी घेउन
गोड पाहुणा अवचित यावा
अपुल्या घरच्या बैलगाडिंतुन !

शत-शतकांना सुखवित आले
मित्र बोलके पुस्तकांतले,
स्नेह-सुखें ते बघती जेथुन
एक असावें कपाट असलें !

ऐन जीवनीं पिकले झुकले
दोस्त असावे भंवतीं बसले
कधीं ऐकतां माझी कविता
चित्त तयांचें दिसों रंगलें !

कष्ट दिसाचे, मातीमधले,
विसरुनि जावे पढतां ओवी,
घरधानिणीच्या शुभ हातांनीं
पसा मूठ दुबळ्यास मिळावी !

कृष्णाबाईच्या कांठावर
असें असावें निर्मळसें घर
जिथें घडावा माझा वावर
देहासोबत—देहानंतर !......

# शोध

कधिं जनांत, काधिं वनांत
एकाकी पण मनांत—
फिरतो मम जीव कसा
शोधित त्या अमृतरसा :

सुमनांतिल मधु बिन्दु
नयनांतिल प्रेमसिन्धु

ज्योतिर्मय हृदयांतिल
शोधित मी सूर्य तसा !

## एक एक

एक एक मुळी आतां
अशीच ही तुटायाची
पानें थोडीं कमी होतीं
नाहीं नाहीं कळायाची...

दूर कोणी तोडितें ना
पाटांतून येतें पाणी,
आतां धार कमी होतां
कालवेल मनोमनीं.

शेत बहरतां सारें
झाड एक हें सुकेल
मन-पांखरूं कशाला
कधीं यावर झुकेल !

एक एक मुळी आतां
अशीच ही तुटायाची
पानें थोडीं कमी होती
नाहीं नाहीं कळायाची

वाटे—
काय याचसाठीं
जोडलेलें होतें नातें
पान वाहतां पाण्यांत
रेषा—
उठते-मिटते !

## एक दिवस असा येतो

एक दिवस असा येतो
सारा मोहरा फिरून जातो...

वाटत असतें, अंधाराची
रात्र नाहींच उघडायाची !
वाटत असतें जीवन म्हणजे—
गणिताचें लांबट पुस्तक,
जुळत नाहीं साधें कोष्टक,
भणभणून जातें मस्तक !

रीत तर चुकली नाहीं ?
आकडा तर हुकला नाहीं ?

रात्र तशीच निघून जाते...

एक दिवस असा उगवतो
कुठून तरी कवी येतो
जुळतें गाणें गाऊन जातो
मीहि हळूच हसून बघतों,
गणितांतून गाणें गातों,
एक दिवस असा येतो
सारा मोहरा फिरून जातो !

एक दिवस असा येतो
मनचा पारा उडून जातो—
आरपार दिसूं लागतें
माझेंच भूत मला बघतें
झालें काय, गेलें काय,
गतकाळाचे उलटे पाय !

मिठी मारते
मळली वाट
म्हणते – पुन्हा
उतर घाट !
– पोटामध्यें उठतो डोंब
खोल दरींत जळतो कोंभ !
तोंच, कोणी मागून येतें,
अपुल्या नाजुक नाजुक हातें –
माझे डोळे झाकून धरतें ;
मीही हळूंच हंसून बघतों
हंसून बघतों
सारा मोहरा फिरून जातो !

– असा दिवस नसता तर
कधींच मोडलें असतें घर ;
पण असें होत नाहीं,
काळें पिसें राहत नाहीं
असा दिवस येतोच येतो
सारा मोहरा फिरून जातो !!

## संवाद !

" बाळांना खेळणीं आणावयासाठीं
किती असा पैसा उधळितां तुम्ही
तुम्हांला कांहीं कळतच नाहीं !..."
म्हणते ती-

हतबुद्ध मीहि पाहत राहतों तिच्या मुखाकडे !
भरलें आहे ना कपाटच मोठें अशा खेळण्यांनीं !
आणखी मुलांनीं मोडलीं-फोडलीं-
अशीं किती गेलीं अडगळीमध्यें ?
वाटलें,- खरेंच, इथें कांहीं हवी काटकसर-
-पण म्हणे मन, तिला उद्देशून
" हे मुलांचे आई,
तुझ्या दहा साड्या हव्यात कशाला,
आणि सैंपाकाचीं सोडून भांडीं
बाकीच्या तूं रांगा लाविल्या कशाला ?
तुझें वीणकाम, भरतकाम-
' स्नो 'चा सरंजाम ठेविला कशाला ?
हो, अन् माझेही इतुके सूट,
बूट, टाय, ग्रंथ - हवेत कशाला ?
रेडिओ-तोहि देऊंया कुणाला !
चार पुष्पपात्रें पेटींत ठेविलीं
आणखी चांदीचे पेले-
हौसेनें पाळिला पोपट, तोही
सोडून दे ना दूरच्या रानाला
आणि मग करूं खेळणीं आणणें अगदीं बंद,
अगदीं बंद ! ! "

–मन म्हणे सारें
मनाशींच असें ;
तिच्यापुढें कांहीं
असें बोलायाची
सोयच नाहीं
तिचें तें उत्तर पुन्हा मिळणार–
" तुम्हांला कांहीं कळतच नाहीं ! "

# कुतुबमिनार

पाहिला मिनार
उंच उंच उंच
झरोक्या-झरोक्यांतून येणारी हवा
–जशी जीवनांत विरळपणें
झुळुकणारी माणूसवृत्ती–
श्वासांत घेतच गेलों शिखराशीं...

पाहिलें तेथून
चौफेर भूमीचें चौगुणी चित्र
–भयाण कबरी राखाडी रंगाच्या, भव्य–भग्न–भ्रष्ट–
चुन्याच्या आंतील मातीच्या विटा ! !
पल्याड एकटा दिल्लीचा किल्ला, लालच लाल !
पाहिला स्तंभ
चंद्रगुप्ताचा तो
जसाच्या तसा,
जशी जीवनाशा कठोर उभी वाऱ्यांत–वृष्टींत !
–देखिली नूतन दिल्लीची नगरी
हिरव्या चुड्याची नवीन नवरी
वृद्धेच्यां पुढ्यांत लाजून वाकत
आशीर्वादासाठीं !

–आणखी इकडे
यमुनेचा ओघ
लोखंडी पुलाचें पालाण ज्याला वेडावीत तरी
गंभीरपणेंच पुढेंच जाणारा श्यामल ओघ !

—पाहिलें मीं ऐसें चौगुणी विश्व,
आणखी पाहिला
उंचीवरून ‘ त्या ’—
माणूस !
माणूस खुजा
बोटाएवढाच इवला-इवला
इवल्या ओठांनीं पुटपुटणारा
इवल्या पायांनीं वावरणारा, इवला बाहुला !

—वाटलें मनाला नको ऐशी उंची
जेथून भासतो
माणूस खुजा—
मजहून दुजा...
आणि झपाट्यानें मिनारावरून
आलों मी तळाशीं
आलों मी खालती !

## आरंभ

सकाळच्या प्रसन्न मुद्रेवर
रेखीत होतें
कोणी
प्रकाशाचें स्वास्तिक...
वाऱ्याच्या लहरींतला
मूक गारवा
स्वतःशींच बोलत होता !

–विजेच्या तिरप्या तारेंत
गुरफटलेला गुलाबी पतंग
पुन्हां फडफडूं लागला होता !

अवखळ नखऱ्याची
पिठाची गिरण
नुसतीच घुमत होती !
वळचणीचें
पांखराचें पिलूं
किलबिलत होते !

–झाडूवालीचा झाडू तर
सरासर
रस्त्याचे दांत घाशीत होता,
मध्येंच त्याच्यावर खेकसत होता !
–मुकादमाची सायकल
झाडूकडे पाहून
मनच्या मनीं हंसत होती ;

पांढऱ्या टिळ्याचा
नवा मुकादम
सायकलीला दटावीत होता
" हसूं नकोस ! "

दूधवालीच्या डोईवरची
गरम चरवी
रोजच्याहून जास्तच खुशींत होती,
तिला
गिड्ड्या दूधवालीची
ठेचाळ घाई पाहून
गंमत वाटत होती !

–स्टोवरचें चहाचें पाणी
उकळत होतें
खळखळत होतें
खिदळत होतें,
म्हणत होतें—" दूध आलें का ?
दूधवाली आली का ? "

## शरदाची रात्र

तारकाखचित
अनंत आकाशीं
माझ्या मी नेत्रांसीं
हिंडवीतों...

अथांग नभाची
निळी कोंवळीक
मजवरी पंख
पसरीते !

एकेक भेटते
प्रकाशाची कळी
हांसुनी जवळी
आमंत्रिते

गवसलें वाटे
सौंदर्याचें बन
मन हें नागीण
होतसे कीं

रंध्रारंध्रांतून
उमलतो चांफा
काय देवबाप्पा
किमया ही !...

## एकदां

एकदां पाहिले होते
ते विलोल चंचल डोळे
काजळावीण काळेले

एकदां प्राशिली होती
ती वेधक मादक कांती
ती नजर जीवनापरती

एकदां उमटले होते
स्वर उंच नि लोलंगत
कमलांत गुंततां गीत !

एकदां—एकदां होती
ऐकिली अनावर कांहीं
ती मदनाघरची ह्वाही !

# अबोधाची वाट

तुझ्या नेत्रांतलें तेज
करी माझें मन जागें
रूप माझें मला कळे
जुळवीत जुने धागे !

फुलांतून फुले कळी
नवा घेऊनिया गन्ध
श्वासोच्छ्वासांत गुंफीत
रेशमाचे अनुबंध...

अचपळ संगतींत
पंख फुटती क्षणांना
चढे सोनियाचें पाणी
अंगीं गंजल्या कणांना !

लखलखीत होऊन
सिद्ध लावण्याचा बाण ;
माझा राहील का नाहीं
वाटे जाईल हा प्राण !

काय याच क्षणासाठीं
केला होता अट्टाहास ;
जुळविला होता छंद
जमविला होता प्रास...

—वाटे माझ्या मनापुढें
ओळ दिव्यांची लागली,
रम्य अबोधाची वाट
बोधानें कीं उजळली !

# कार्तिकाच्या पहाटेला

कार्तिकाच्या पहाटेला
दूर कोठें देवळांत
चाले काकडआरती
तिला चौघड्याची साथ

कार्तिकाच्या पहाटेला
थंडी खिडकीशीं येई,
कंकणाच्या रवापरी
कांहीं कुजबुज होई...

कार्तिकाच्या पहाटेला
पक्षी उठले लौकर,
शेत लवलें मोत्याचें
तेंही दूर-दूरवर !

कार्तिकाच्या पहाटेला
चंद्र उभा रेंगाळत
कुणा ठावें कोणीं कसा
याचा धरियेला हात ?

कार्तिकाच्या पहाटेला
बाहूवरि तुझा माथा;
उलगडे दुमडला
अंतरींचा भावगाथा !

# सुगंध-स्मृति

आज कित्येक दिसांनीं
फूल जाईचें पाहिलें,
आणि गंध दिगंतींचे
अवकाशीं तरळले...

—बालपणीं वेंचिलेल्या
शतावधि मुग्ध कळया
ताम्हणांतल्या पाण्यांत
उमलायाला लागल्या !

वेलावरी वेलाखालीं
सारी फुलांचीच सृष्टी
ओंजळींत किती घ्यावी,
मन वृथा होई कष्टी

माझ्या जाईच्या फुलांत
देव जावेत झांकून
स्निग्ध आईच्या पूजेंत
सुख यावें ओघळून.

चिमुकल्या टेबलाशीं
कोणीं ठेविलीं रे फुलें ?
कसे हंसले अचूक
वृद्ध गुरुजींचे डोळे !

आणि कर्दळीच्या पानीं
मालतीनें घेतां फुलें,
तेव्हां तर पापणींत
शुभ्र धुकें तरंगलें !

—आतां दुचाकीवरून
धांवतांना शहरांत
उष्ण वारे भोंवतालीं
सदाचेच फिरतात

दूर तापल्या दिशांत
फुलें जाईचीं लोपलीं,
तशी भुलभुलावण
आतां फिरून कोठली ?

आतां सुगंधस्मृतींत
कधीं जीव हारपावा
देवा ! मनांत एवढा—
तरी उरूं दे ओलावा !

## आतां भरल्या संसारीं

आतां भरल्या संसारीं
कोठें नाहीं उणें स्थळ
पश्चिमेच्या लहरीची
दिसभर सळसळ !

उन्हें कोवळ्या सूर्याचीं
वावरतीं घरभर
यथाकाल गवाक्षांत
डोकावते चंद्रकोर...

धूप डौलानें फिरतो
उजळतें नीरांजन
सुख उभ्या उभ्या येतें,
जातें घटका बोलून !

आतां भरल्या संसारीं
कोठें नाहीं उणें स्थळ,
आणि,
तुझ्यावांचूनही
तुझें मला पाठबळ !

तुझी शपथ, तुझीही
होते मला आठवण;
उगाच कां असा मध्यें
कोठें उसवतो क्षण ?

उष्ण मूक आसवांची
तुझी आहे तुला जागा,
वेड्या वनींच्या पांखरा,
नको रागावूं वाउगा !

## एक अश्रु

स्वातंत्र्याचा सण   दारांत रांगोळी
शृंगारली आळी   झगमगे !

तोरणें, पताका   सांगती डोलून
स्वातंत्र्याचा दिन   उगवला...

—स्वातंत्र्यासाठीं या   आम्हीं काय केलें ?
प्रश्न हाच सले   चित्तीं माझ्या

वृक्ष लावणारे   निघोनिया जाती
तळीं विसांवती   सानथोर !

विचारीं गुंतत   हिंडलों बाजारीं
पेठेंत केवढी   गजबज !

केवढी धांदल   केवढा उल्हास
केवढी आरास   भोंवतालीं...

—मात्र एका दारीं   दिसे कोणी माता
दीप ओवाळितां   छायाचित्रा

ओल्या नेत्रकडा   हळूच टिपून,
खालीं नीरांजन   ठेवीत ती !

हुतात्म्याचें घर   सांगे कुणी कानीं
चित्त थरारोनी   ऐकतसें...

—होते लखाखत   पेठेंतले दीप
आकाशीं अमूप   तारा होत्या

चित्तापुढें माझ्या   एक दीप होता
एक अश्रु होता   माउलीचा !

## काय लागतें

काय लागतें–
जगावयाला ?
किती लागतें
जगवायाला ?

चार वितींचें
छोटेंसें घर,
थोडा कांदा,
मीठ नि भाकर !
हवा वाहती,
पाणी निर्मळ
अन् थोडेंसें
मायेचें बळ !

किती लागतें
जगावयाला ?
किती लागतें
जगवायाला
परी कधीं—
या इतुक्यांसाठीं
रक्त जळे
किति धमनीपोटीं !

## किल्मिष !

— काल रात्रीं
  माझ्या मनाच्या दाराशीं
एक काळें कुत्रें येऊन बैसलें...
सारखें भुंकत
सारखें भुंकत
भुंकणें तयाचें कानां चावे घेत !

— हाकलाया तया नाना यत्न केले
  ... ... द्वाड तें जाईना
  ... ... भुंकणें राहीना

शेवटीं निर्धारें
मारिली फेंकून वेताचीच छडी
आणि, तें पळालें...

— परंतु जातांना,—द्वाड तें कुत्रें
भुंकण्याहूनही अतीच कर्कश
अतीच कर्कश कैंकाटत गेलें ! !

## जातां जातां

कॉलेजाला जातां जातां
मधेंच विणकर-वस्तीवरती
सूत जमविता
दिसला साळी—
अंगावरती,
खांद्यावरती,
शर्ट तयाचा
चिंध्या गाळी !

—अन् त्या दिवशीं
वर्गापुढतीं
शिकवायाचें
जमलें नाहीं ;
मांडीवरचें
वस्त्र लोकरी
सळसळ करुनी
छळीत राही !

ग्रंथ संग्रहाल... क्रम 23045 दि. ... क्रमांक 9386 वॉ. क्र. ...

झाडाखालीं दुकान मांडुन
पै-पैशाचा भाजीपाला—विकावयाला
बसतो कोणी, वयें वाकला
दाढीवाला...

शिळी आणखी कांहीं ताजी
बुट्ट्याबुट्ट्यांतुन भरली भाजी
नेइल कोणी कांहीं-कांहीं,
पै-पैशाची ‘ अप्रूपाई ! ’...
येइल कोणी गरीब, आणिके
नेइल वांगीं पिळवटलीं जीं !
उरेल यांतुन कांहीं थोडें
सुरकुतलेल्या पोटासाठीं...

धूम धांवती बस–मोटारी,
धूळ उडे ती—
कितीक बांधिल नाकावरती
रुमाल नाजुक दाढीवाला ;
धूळच जेथें अवतीं भंवतीं
तिथें धुळीचा विटाळ कसला ?

गोजिरवाणीं बाळें जातीं
रस्त्यावरतुनि तीं शाळेला
दुडदुड धांवत—हांसत—खेळत—
भाजीवरची उचलुनि दृष्टी
उल्हासानें कधीं पाहतो
चित्रें त्यांचीं दाढीवाला......

अन् गिरणीचा होता भोंगा
ओळखिचे कुणि ‘ जुने ’ परतती
दिडकीचें मग पान मागती,
चुन्यांत तंबाकू घोळसती,
यालाही ती चिमूट देती
चढे मस्तका तिखट चिमुट ती
क्षणभर मुंग्या झिणझिणताती !...

— मावळतां दिन
दुकान मोडुन
घरास जावें
रम्य उद्यांचें चित्र फुलावें
मनांत सारें !...

सूत निहळतां गेल्या रात्रीं
पिळवटलेल्या घामट गात्रीं
— सूत परी तें सुटून गेलें
स्वर्ग असा हा हातीं आला—
झाडाखालीं बसणें घेउन
पै-पैशाचा भाजीपाला ! भाजीपाला

# भिकारीण

'पोस्त' मागाया सणाचा
आली अंगणीं भंगीण,
बाळ छोटा येई, सांगे :
"दादा, आली भिकारीण!"

— आणि पाहतां दाराशीं
दिसे लाचारीचें हंसें :
त्याची लाज माझ्या चित्ता
शत डंख करीतसे

गौर वर्ण–उंच बांधा—
जुन्या बाजाराची साडी—
वेडें दैन्य मानव्याची
अशी फरपट काढी!

बाळ सहज बोलला
तिजलागी भिकारीण,
तिची क्षमा मागायाला
शब्द आणूं मी कोठून ?

# हातीं थरारती काठी

हातीं थरारती काठी
चाले जपून कडेनें,
मंद झाली वाटचाल
जीविताच्या वळणानें !

नगरांत सायंकाळीं
देवळाच्या कोपऱ्याला
तिथें, त्याच वेळीं–तोच—
तुम्हां भेटेल एकला !

सूर्यराजाचीं किरणें
संथ ओघळती खालीं
इमारतींच्या पायाशीं
लांब पसरे सावली !

घर-संसारापासून
रोज रामापाशीं यावें,
आणि थोडें अंधारतां
पाय मागें वळवावे !

जुनें ओळखीचें कोणी
आतां क्वचित भेटतें
क्षण निरागस स्मित
मुखीं उजळून जातें !

— परी दिसंदीस आतां
जुने लोक कमी झाले :
जुने लोक कमी झाले
मन म्हाताऱ्याचें हले !

धरी काठी आवळून
चाले जपून कडेनें
संथ ओघळतीं खालीं
सूर्यराजाचीं किरणें !

आठावर ये
छोटा कांटा,
अतां वाहतो
शीतळ वारा
झुळझुळणारा...

नगरांतिल या
घराघरांतुन
झगमग सारे
दिवे पेटती
गजबज चाले
दिव्याभोंवतीं !

बारा घटका
शिणवटलेले
गढूळ डोळे
ऊन घास
पाहून हरखती !
सूर पेटीचा
उमटे कोठें
किशोरिच्या
मृदु आवाजासह,
मनें भाबडीं
त्यांत नाहतीं
हुशार होउनि
पंख झटकतीं,
किलबिल करतीं
थोडी-थोडी

## भरली पेंठ

भरली पेठ बाजाराची,—
माल मांडला नामी-नामी
वनस्पतींचा नवा तजेला
भरे देखत्या अंतर्यामीं...

दाटीवाटी बसल्या बाया
त्यांत एक ही तरुणीताठी
समोर बसली कलिंगडांची
अर्धी-भरली घेउनि पाटी

गरिबीचें तें ठिगळ साडिला
वाकी दण्डावरि परि रुतली
अर्धखणाची अपरी चोळी
लज्जात्राणा सिद्ध जाहली !

—भिरभिर बघते निर्मळ नेत्रीं
नगरी रस्त्यावरली यात्रा,
तिला दिसेना तिचियासाठीं
किती जणांचा चुके पवित्रा !!

## कोकणकन्या

पाहिलें कोकण
समृद्ध हिरवें
झाडांचें तें राज्य सदा नवें नवें !

आंबे-नारळीच्या चंचळ बागा,
रसाळ काजूच्या आणि रातांब्याच्या
आणि फणसाच्या ओळीनें रांगा !
राजसबाळी कोमल केळी,
समृद्ध भूमीचा सफळ कुसवा ओथंबलेला !

लाजरी बकुळी,
चंपक हळवा,
झुकते माड...
लक्षुमीची बाग असावी जशी
पाहिली तेधवां भूमी ती तशी
सागरापाशीं !

पाहिली तेव्हांच, एक भूमिकन्या
तांबडी लालट
ओलांडीत वाट
चालली कन्या ती
नगराकडे ;
उचलीत मोळी
जिवाच्या पाडें—
घेऊन कुणाच्या चुलीचीं लाकडें !

तांबड्या धुळीनें माखले पाय,
सहस्र रंध्रांनीं वहात्या खारट—
घामानें भिजलीं थिटीं थिटीं वस्त्रें;
भिजती पाठ, पोट अन् पिंढऱ्या
भिजतीं अवघीं इंद्रियचिपाडें...

समृद्ध हिरव्या भूमीची छाया
क्षण तिच्या मुखीं लकाके-सापडे,
क्षणैक दिसतीं
उजळ ज्वालेचीं भिजलीं लाकडें,
मन माझें झालें उजाड-वेडें
उजाड-वेडें !

## गौर

पूजा मंगळागौरीची
चाले सगळी धांदल
गोड धुंद कोलाहल !

माहेरच्या माणसांचा
भोतीं प्रेमळ गराडा
पूजे आणिला केवडा

लेकी-सुना पूजतात
साजशृंगार लेवून
माता बघे कौतुकानं

—परि हिचें वेडें मन
अजूनही घोटाळतें
ऊन मागें रेंगाळतें...

'बसूं जोडीनें पूजाया'
उगाच तें म्हणायाचें
उगाचच सांगायाचें !

नवी साडी सावरतां
सावरतां सावरेना
घोळ बाई आवरेना

तोंच टपालवाल्यानें
बंद आणिलें पाकीट
वेडें जग झालें नीट...

चौरंगाच्या चार केळी
कुजबुजल्या कानांत
पाणी हले ताम्हणांत

गौर मातली फुलून
केवड्याचें गेलें भान—
आंत पेटल्या गंधानं !

## टपटप आला पाउस

टपटप आला पाउस, पडतें
चकाकतें पाणी
मधून वारा फिरे गतीनें
पिसाट होवोनी !

क्षणांत सारी बदलुनि गेली
पृथ्वीची कान्ती
भरुनि वाहती तप्त पन्हाळी,
पागोळ्या गळती

भिजवित कपडे बाळ नाचतो
खुल्या अंगणांत
गारगारसे थेंब जिभेवर—
घ्यायाचा बेत !

भकाळ-पोटी उठे जनावर
बघतें चोहिकडे
कुठुनि कृपा ही अशी बरसली
विचारतें आंतडें !

अंधारुनि ये म्हणुनि गृहामधिं
गृहिणी लावी दिवा,
बाहेरिल परि वीज चमकतां
चित्त म्हणे—' वाहवा ! '

निंबावरती निवान्त बसली
भिजलेली चिमणी
हलतां फांदी, बसे सावरुन
बघे बावरोनी

मी माझेंपण विसरुनि बघतों
उदार गगनाकडे
नवधारांचें गाणें गातों—
मेघ–तिथें, पलिकडे !

सळसळ सळसळ
करितो पिंपळ—
वाऱ्यासंगें करीत दंगा,
ताजेपण–उमदेपण तें किति !

जवळ तळ्याचें
निश्चल पाणी
बघतें—
बघतें आशालोलुप नयनीं,
कधीं अन्तरीं
होइल ऐशी
अखंड खळबळ
वेडी सळसळ !

—प्रतिबिंबच पण
त्या पानांचें
केवळ पडतें
संथ सुवेळीं;
आणि अवेळीं
पानच केव्हां
वरून पडतें
गळून पिवळें;
थोड्या लाटा, थोड्या लाटा
उठविति कांटा...
चित्त तळ्याचें क्षणैक सुखविति;
अनंत वेडी
व्यथा वाढविति !

# आठवण

वेळ मध्यानरातीची
सारें स्थिरचर शान्त ;
गेला पाऊस पडून
मनीं दाटला निवान्त.

खांदीं वाहिली कावड
शिंपूनिया पृथ्वीवर
ढग विसावाया गेला
कोठें क्षितिजाच्या पार !

देव्हारींच्या देवापरी
वारा स्वस्थ बसलाहे
त्याचा असा प्रौढपणा
वेल कौतुकानें पाहे

झाड आपुल्या दारींचें
कांहीं बोलतच नाहीं
ध्यानसमाधि लागली
किती दिवसांनीं का ही !

मुग्धे, अशा अशा वेळीं–
होते तुझी आठवण,
गाभाऱ्याच्या कोपऱ्यांत
पेट घेतें नीरांजन !

# गोकुळींचा हरी

असा रांगतां रांगतां
बाळकृष्ण मोठा झाला
  किती दाखवितो लीला !

कधीं नीज संपतांच
गातो तालसुरावर,
  ' हे ब्रह्मा, हे विष्णु, हे शंकर '

कधीं बनून सासरा
म्हणे, " कमळ, ऊठ ना,
  अगोदर चहा दे ना ! "

कधीं हातीं तलवार
बने शूर सरदार
  माझ्यावर सारे वार !

कधीं दारीं टकटक
होतां पहातें उठून
  उभा छोटा ' पोष्टमन '

कधीं खोटी खोटी भाजी
कधीं खोटें खोटें दहीं
  मला घ्यावें लागे बाई

कधीं खाऊन मृत्तिका
वर मिळतां तडाखा
  विश्वरूप दावी लोकां !

कधीं दादांची नक्कल
हॅट घाली कपाळाला
सांगे, ‘ जातों, वेळ झाला ’

कधीं बने ड्रायव्हर–
नेई क्षणांत पुण्याला,
माझ्या आईच्या गांवाला !

असा नानारूपधारी
माझ्या गरिबाच्या दारीं
खेळे गोकुळींचा हरी !

क्र. ९४०५

## रात्रींचा अभ्यास

रेघ घेतली आंखून
कोऱ्या कोऱ्या पाटीवर;
भ-भ-भ भटजीचा
लागे उमटूं अक्षर !

-सकाळच्या शाळेसाठीं
चालूं जाहला अभ्यास,
एका 'भ'च्यासाठीं तरी
खर्च झाला एक तास !

आणि मध्यें केव्हांतरी
झाली पुन्हां तपासणी
पिशवींत आहे-नाहीं
बालवाचन, लेखणी.

आलें ध्यानांत हळूंच
नाहीं रंगीत पेन्सील
झाला आरडाओरडा
झाली मातेची धांदल...

डबा मधल्या सुटीचा
गेला मध्यें डोकावून;
गेली पेन्सील तोंडांत
चव पाहिली चाखून !

वर्गांतलें बंड पोर
गेलें चापटी मारून
झाली बाईंनाही त्याची
सारी तक्रार सांगून

–आणि थोड्याशा वेळानें
रेघ दिसेना पाटीची,
सारीं अक्षरें पळालीं
वेळ होतां ' समाधी 'ची !

## डोंगरापलीकडे

डोंगरापलीकडे—
मामाचा गांव आहे
गांवाच्या ओढ्यांतून
जळ बारा मास वाहे !

ओढ्याच्या कांठावर
मामाची शेतीवाडी,
जाळींतलें करवंद
आंबटाची हौस फेडी

मामाच्या विहिरींत
मधाचें मोठें पोळें,
आंब्याच्या सुगीसाठीं
'कानफाटे' जमा झाले !

झुलता पानमळा
माझी ठरेना नजर
मामी देखणी गुणाची
घेते जरीचा पदर

मामाच्या देवडीशीं
साऱ्या गांवाची वर्दळ
उंबरठा पुण्य घेतो–
जाजमाचा झिजे तळ

सख्ख्या मामावांचूनि गा,
कोण बोलावी आजोळीं ?
घोडें दारांत थांबतां
दहीभातानें ओवाळी ?

डोंगरापलीकडे
मामाचा गांव आहे
उंच माडीच्या वाड्याचा
नित्य मला लोभ आहे !

–अरे डोंगरा, डोंगरा,
जरा बाजूला होतोस,
गांव दिसेल मामाचा
आहे दूर बारा कोस ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 23041 वि: 3104
क्रमांक 9388 नों दि: 29/3/54

# कितीक दिसांत

कितीक दिसांत—
पुरुष-पाण्यांत
अंगें कांकडेतों
पोहलों नाहीं,
तापत्या वाळूंत
मऊशा उन्हांत
अंग वाळवाया
लोळलों नाहीं ! १

कितीक दिसांत
नेसूनि सोंवळें
कुलदेवीपुढें
बसलों नाहीं—
धूप, दीप, पूजा,
फुलांची आरास
आरती - मंत्रांत
रमलों नाहीं ! २

कितीक दिसांत
फुलांभंवतींच्या—
पांखरांमागून
धावलों नाहीं;
हिरव्या कैऱ्यांना
चुकीचे दगड
मारीत उगाच
शिणलों नाहीं ! ३

कितीक दिसांत
जुन्याच कविता
काढून वाचीत
बसलों नाहीं
—मोकळेपणानें
आणि स्वतःशींच
स्वतःला हंसलों
हंसलों नाहीं... ४

कितीक दिसांत
आईच्या फोटोशीं
भारावून असा
बोललों नाहीं,
जळता कापूर
भुर्रकन् जळाला
अंगारा मात्र मी
ल्यायलों नाहीं ! ५

कितीक दिसांत
विजेचीं अक्षरें
वाचीत ढगांशीं
बोललों नाहीं,
जळल्या स्वप्नांचीं
होऊनि खन्त
आंतल्या आंतच
फुललों नाहीं
कितीक दिसांत,
कितीक दिसांत ! ६

## दो बाजूला ऊंसमळा

दो बाजूला ऊंसमळा अन्
मधून वाहे नदी
जळाला कमती नाहीं कधीं !

—गांवकुसाचा पाणवठा हा
लहानसा पण गुणी,
असतो आपुल्यांत रंगुनी...

सकाळवेळीं स्नानासाठीं
जमती नारीजन
धुण्याचीं वस्त्रेंही घेउन

धुणें जाहलें, स्नान चाललें,
वस्त्रां मिळतो पिळा
परततो चवघींचा मेळा

डोईवरती पिळे धुण्याचे—
त्यांतुनि ठिबके जळ,
मुखामधि गप्पांचें मोहळ !

...मखर कुणास्तव–केव्हां केलें;
लग्न कसें ठरलें;
कुणाचें वऱ्हाड कां फिरलें !

मूल कुणाचा कसा बहकला
बाइलवेडा बनून
राहतो चूल वाइली करून

पंढरिला कुणि कशी निघाली
अधिकमास हा म्हणून
सून घरिं बाळंतिण ठेवून

आठ दिसाला कसा मारितो
वांड जनीचा पती,
बया ती लईलई हिकमती !

वाकुडदांत्या पांडूतात्या
बसतो हेळावर
एकटक बघतो कीं मगरुर !

लग्नकाळच्या गुऱ्हाळगप्पा—
करी कुणी बडबड
मनामधिं साऱ्यांच्या फडफड ! !

पांद कधीं संपली कळेना,
अतां वळावें घरीं
उद्यांची सकाळ जुळते उरीं

दो बाजूला ऊसमळा अन्
मधून वाहे नदी
जळाला कमती नाहीं कधीं !

आठवतें ना—
ओढ्याकांठीं अपुल्या घरची
गाय घेउनी धांवत होतों
चरावयाला सोडुनिया तिज
पारंब्यावर लोंबत होतों !

आठवतें ना—
डोहामधलें स्वैर डुंबणें
अंगावरिचे ओले कपडे—
अंगावरती तसेंच सुकणें,
सुकतां कपडे पुन्हां पोहणें...

आठवतें ना—
करवंदाचा चीक बिलगतां
बोटें अपुलीं बसलीं चिकटुन
अन् कैऱ्यांच्या दिवसांमध्यें—
हातकातडी गेली सोलुन !

आठवतें ना—
अर्धा लाडू फोडुनि खाणें
चिंच तोडुनी तुकडा देणें
देवापुढची खडिसाखर ती
गुरवा चुकवुन पळवुन नेणें !

आठवतें ना—
हातामध्यें हात घालुनी
अर्धा डोंगर गेलों चढुनी
वर्गामधल्या गोष्टी बोलत
उन्हांत फिरलों शेतांमधुनी

आठवतें ना—
माळवदावर तिसऱ्या प्रहरीं
मस्त आमटी भाकर खाणें
आईच्या पायाशीं घोळत
शनिवारीं मारुतिला जाणें !

— मला तरी नित आठवतें गा,
आठवतें तें फुलतें जीवन
आक्रसलेल्या चाळिमधें या
उबगुनि जातां देह आणि मन

## एक कणिका

नव कमलदलांनीं
भरून गेलें तळें
आंतील जलाचा
भाव कुणाला कळे,
गुदमरुनि तयाचा
श्वास आंत घुटमळे !

वरि कमल डुले, तें जगा हवें वाटतें
ही रीत पाहतां माझें मन फाटतें !

# उद्ध्वस्त वाडा

गांवाच्या बाहेर थोडासा बाजूला
उद्ध्वस्त वाडा हा बसला एकला

दिसते लांबून प्रचंड दाराची नुसती चौकट
गणेशपट्टी तशीच आहे अजून शाबूत !
उंबऱ्यांत केलीं कीटकांनीं घरें
आडोशाला कोठें राहतीं पांखरें !

दिसे दारांतून
उंच खिडक्यांची लांबट भिंत ढासळलेली
लोंबते दगड उशाशीं घेऊन पेंगुळणारी !

मळकसा गिलावा अजून कोठें दिसतो आहे !
महिरप एखादी अजून वाकून बघते आहे;
रंगीत खुंटी भाबडी एखादी
आपुल्या जागीं तिष्ठत आहे—;
–वाट पाहात आहे
दुरून फेकल्या भर्जरी वस्त्रांची,
काढून ठेवल्या वक्षींच्या हाराची,
कधीं घाईतच
ओठंगून राहिल्या रंगीत बोटांची !

खालीं अंगणांत—
पाण्याचें कारंजें आहे फुटलेलें,
सुकल्या बागेच्या सोबत बसलें :
तरवड मात्र आहेत फुलले पिवळ्या फुलांचे !

लोक बोलतात :
पिवळा नाग वाड्यांत सारखा हिंडत आहे !
लोक म्हणतात :
मालकच तो आहे पूर्वीचा याच वाड्याचा
पुरल्या धनाचें रक्षण करीत हिंडत आहे !

पोरेंबाळें कोणी जातच नाहींत वाड्याच्या बाजूनें
सुवासिनी तर फिरकत नाहींत वाडयाच्या वाटेला !

मालकाचा कोणी दूरचा वारस
वर्सांत एकदां इकडे येतो,—
मोठ्या कोनाडयांत—नैवेद्याचें पान ठेवून जातो !

नैवेद्याचें पान—केळीचें हिरवें पाहतां पान
रंगीत खुंटीचें हरखतें भान :
—वाटते वेडीला अजूनही येथें
फुलेल जीवन !
वाटते वेडीला
दिसतील रांगोळ्या,
रंगीत पाट,
वाढणारे हात,
बांगडयांचा गोड किणकिणाट...

गांवाच्या बाहेर थोडासा बाजूला
उद्ध्वस्त वाडा हा बसला आहे,
रंगीत खुंटी भाबडी एकटी
आपुल्या जागीं तिष्ठत आहे !

# यात्रा

उगवला आतां नारायण !
ध्वान्त दिशांना पळे–मोकळें होई हें त्रिभुवन !

नभिं लुकलुक होत्या करीत तारा कुणी
त्या येणाऱ्याची हाक जागवित मनीं...
त्याच्या स्पर्शें अंधाराची धार जाय वितळुन
उगवला आतां नारायण !

पांखरा कंठ, अन् प्राण मिळे मानवा
गाइच्या गोजिऱ्या स्तनांत पान्हा नवा,
पूर्वेस रम्य मोतिया—दुधाची सागरांत शिम्पण !
उगवला आतां नारायण !

तो कृपावन्त ये वरती क्षितिजांतुन
टाकीत पाउलें चाले सरसावुन
उजळित ‘अवघ्या वाटा’, होई तेजाची उधळण
उगवला आतां नारायण !

भूमीचा कुसवा जणूं नव्यानें फुले
आगळें मुखावरि तेज तिच्या विलसलें...
वंदित ती या चरणां पावन, ओलावुनि लोचन
उगवला आतां नारायण !

हा वेदकाळिंही असाच उगवत असे
हा अर्घ्य मुनींचे युगानुयुग घेतसे—
कुणि अर्घ्य द्या न द्या, याची यात्रा चाले गगनांतुन !
उगवला आतां नारायण !

## पाळणा हालतांना

पाळणा हालतांना
वाजतो कुरुकुरु
बाळ तृप्तींत अतृप्त
मूठ चोखे चुरुचुरु !

पाळणा हालतांना
संसारगीत गातो !
झंकार खेळण्याचा
प्रेमाची साथ देतो !

पाळणा ओढतांना
मातेचें मन हाले,
भविष्य-दरवाजे
एक एक खुले झाले...

जागतें जग मिटे
पापणी-पैलतीरीं
तीट काजळाची खुले
गोऱ्यापान गालावरी !

झोक्याच्या वारियानं
थेंब वाळला ओठींचा
हासतो स्वप्नामधें
चिंतामणी ग ओटींचा !

—झोपेंत वाढताहे
वाढता बाळकृष्ण,
'मूठ मोठी मोठी होवो'
म्हणे माउलीचें मन !

—व्यवहाराच्या चक्रांत
शर्ट भिजतो घामानं,
खुंटाळ्याच्या डोक्यावर
देतों फेकून दुरून...

आणि संकष्टीचा चंद्र
हळू हळू येई वरी
असा एक चमत्कार
घडे नित्य माझ्या घरीं !

चंद्रम्याच्या संगतींत —
सांगसी तूं लाख कथा;
माझ्या मनाच्याही जिभा
गाती बोलतां बोलतां...

कान्ता अधिकचि कान्त
भगिनीच्या कौतुकांत,
भारावल्या लोचनांत
पुन्हां माता प्रगटत—

जशी ओढ्याची खळखळ
निवे नदीच्या कुशींत,
द्वाति मनाची अवखळ
थांबे प्रीतीच्या उशींत !

# नक्षत्रें

नक्षत्रांची कांहीं नाहींच माहिती
धूम धावणाऱ्या माझिया मनाला—
होती केव्हांतरी यादी केली पाठ,
अश्विनी–भरणी–कृत्तिका–रोहिणी...

आजला नभींच्या साऱ्याच चांदण्या
भासती सारख्या, धूम धावणाऱ्या माझिया मनाला !
ग्रह अन् नक्षत्रें, ब्रह्मांडामधले नवे नवे तारे,
नव्या सूर्यमाला—
तपशील सारा गेलों विसरून,
जशी ती भूमिती आठव्या यत्तेची !

आतां— कधीं कधीं
मोकळया गच्चीला लावून पाठ,
बाळाला माझिया घेऊन कुशींत
दावितों कौतुकें
चांदण्या चार...

माझिया कुशीचें गृहींचें नक्षत्र
दावितें चांदण्या मलाही बोटांनीं

आणि अंतरांत
उमलतीं फुलें,
नसतां प्रकाश
नसतां पहांट !

# जास्वंदी

जास्वंदी ! तुझी ओळखच मी विसरून गेलों
क्षमा कर मला :
कालच सकाळीं
कोणाच्या तरी बागेच्या कोनांत
उभी राहून तूं
वेधक लाल रंगाच्या फुलांनीं
खुणाविलें मला,—
क्षणीं आलें भान
अरे ही जास्वंदी...

तशीच आहे कीं अजून अल्लड,
अजून प्रफुल्ल,
हंसऱ्या मुखाची
अजून आहे रसरसलेली !
पाटाच्या पाण्याची
शीतल धुंदी पानापानावर
अजून तशीच;
वेळूची सावली लाभली, तयाची
गर्भश्रीमंती ती अजून तशीच,
किती हंसूं तरी—म्हणणारीं फुलें...
यौवनकलेची धुंदीही तशीच !

जास्वंदी ! तुझी मोहक हाक
माझ्या नयनांच्या
थकल्या दृष्टीला कितीक वर्सांनीं
खुणावीत होती

मागें राहिलेली
धुक्याची नगरी
दाखवीत होती !

आठवाचे दंव जमले मनांत
तुझिया स्नेहाची बालिश पहाट
फुटली पुनश्च पिकल्या रानांत !

# नदीच्या कांठाला

नदीच्या कांठाला— कळकीचें बेट
पल्याड लागल्या बाभळी दाट
शेफारलें उंच— गवत बनांत
शेवरीचीं झाडें मधून त्यांत !

पश्चिमेचा सूर्य होता उतरत
बाभूळबनांत...
पायांनीं दाविल्या दिशेनेंच जावें
बनाचें अवघ्या दर्शन घ्यावें
अशी वेडी ओढ होती बालमनीं
चाललों एकटा— एकटा त्या दिनीं !
मधून कृष्णेचें दिसे थोडें पात्र
पश्चिमेचा रंग त्यांत उतरत...

चाललों चाललों रमलों बनांत
गेलों पिसापरी दूर तरंगत—

अचानक रंग पश्चिमेचा गेला
आणिक कंठाशीं प्राण गोळा झाला
असेल आई पहात वाट...
सोडेना आतां तें कळकीचें बेट :
पांखरें बनांत शोधितीं घरटीं
माझ्या मनाची हो चाळण पुरती !

'देवानें आणिलें माघारीं लेंकरूं'
दृष्ट कोणी माझी लागलें उतरूं

अजून वाटतें   अशीच अवेळीं
बाभूळबनांत   चुकावी वाट
आंतल्या विश्वाची   घडावी भेट !

# चढे इमारत

चढे इमारत उंच उंच ही
हमरस्त्याच्या या बाजूला,
स्वच्छ गुळगुळित सिमीट-भिंती
जिथें तिथें हा कोन साधला !

— पहिल्यापासुन कामांवरती
इथें धोंडिबा खपतो आहे

घडतां घडलें नवीन कांहीं
किती सावल्या फिरल्या,
पळेंहि गेलीं—तास वाजले—
खिडक्या आकारून राहिल्या—

— परवां चौथ्या त्या मजल्याची
लाल मुलायम फरशी जडतां
" मालक येथें राहणार ना ! "
कुणीं बिलंदर केली वार्ता

रंगसफेती होइल आतां
अन् नांवाची येइल पाटी
संगमरवरी फरशी तिथली
धोंडीबानें आंखली होती :

उंच वरी ही चढे इमारत
बांबू आतां काढायाचे,
घेउनि हातीं रितीं घमेलीं
चला धोंडिबा, उतरायाचें !

# अधीर

अधीर ओठ ते तुझे
न बोलतांच थांबले :
बोलल्याविनाहि तूं
भाव मन्मनीं फुले !

दिसेल शुभ्र चांदणी
वाटलें असें मना,
तोंच–तोंच कोणता
मेघ आड ये पुन्हां ?

धुंद नेत्र ते परी
पाहती — न पाहतां
एवढें न का कळे
मला गडे अजाणतां !

मनांतलें मनांतही
मुकाट राहिना कसें
पापणींत दडविसि तें
भ्रुकुटिंतुनि वर विलसे...

इवल्या या ओठांनीं
भाव कसा वळवावा
त्यांची तर अन्य रीत;
निःशब्दच पटवावा !

# कधीं अचानक

कधीं अचानक
कुविचाराचा
सरकत जातो
साप मनांतुन

‘ काठी आणा ’
म्हणतां–म्हणतां
बिळांत कोठें
बसतो जाउन !

## हाक

होती अपरात्र झाली—
बापू-बापू-अरे बापू   हाक कुणीं ही मारली?
होतों सुखें पहुडलों   शांत माझ्या संसारांत
तोंच हाकेनें नांवाच्या   जाग आली अवचित
हाक मारितो मुकुंद   माझा सखा बालमित्र
मला माहीत नाहीं का   हाक मारायाची रीत!
–दार पाहिलें खोलून   कोणी नव्हतेंच उभें,
फक्त चांदणें एकटें   गच्चीवर होतें सुनें!...

हाक मारितो मुकुंद?   कोठें उभा असेल का?
छे! छे! आतां तें अशक्य...   त्याची दूर गेली नौका!
सखा मुकुंद जाऊन   आज किती दिस झाले!
काय अनंतामधून   त्यानें मला बोलाविलें!
असाच तो यावयाचा   अचानक माझ्याकडे
आणि हात धरूनिया   न्यावयाचा नदीकडे

–ये ये, मुकंदा या घरीं   असा संकोच कशाला?
पहा माझा हा संसार   कसा आहे मीं थाटला!
स्वच्छ पाटाताटावर   दोन ऊन घास खा रे
तुझ्या वहिनीच्या हातीं   बघ अमृताचे झरे

झोप निवांत घे जरा   ऊबदार रजईत
झोप नाहाच यायची   गोष्टी रंगतां सुखांत
तुझें हास्य खळखळ   मला ऐकायाचें पुन्हां
तुझे शब्द ऐकायाचे:   ‘बापू निघाला शहाणा’

मला आहे रे माहीत   तुझे तिन्ही डाव गेले
ओंजळींत घेतलेलें   सारें जीवन सांडलें !
किती सुखाचा संसार   असतास तूं मांडला
कायमचें बाद केलें   कुणीं उगाचच तुला ?
तुझ्यासाठीं मीं मुकुंदा   कांहीं-कांहीं केलें नाहीं
सारें संपलें नाटक   मग कळलें मलाही !
काम नाहीं नाटकांत   तरी रंगभूमीवर
एकेकाला उभा करी   देव खरा वेडापीर !

...कुणी म्हणाले, मुकुंदा   पुढें वेडा झाला होता -
देवळांत बसायाचा   छंद एक त्याचा होता !
देव नाहीं ना पावला   तुझ्या वेड्याच्या हाकेला
असो—झालें गेलें त्याचें   आतां स्मरण कशाला ?

हाक दुरून कां अशी   अपरात्रीं मारिलीस,
आतां भेट कशी व्हावी   मध्यें युगें अठ्ठावीस !

आजच नवी नवी
कुंची घातली बाळाला
खण जरीचा फाडला !

आधींच गोरेपण,
खण मामाच्या घरचा
भाचा नटे नवसाचा !

माता गुंतली कामांत
तरी सदा डोळ्यापुढें
उभें गोंडस रूपडें

बाळ येई दुडदुडू
घाली विळखा गळ्याला
धावे मुख ओढायाला

कसा सुचे कामधंदा
भूक लागली बाळाला
छंदखोर गुलामाला...

मनीं घोकते माउली
तिन्ही सांजे, ये ग बाई
दृष्ट काढायाची राही !

दृष्ट काढली मनांत
लक्ष वेळां माउलीनें
मीठमोहरीच्या विणें ! !

## काय कविवर्य !

—दिवसभराच्या नीरस श्रमांनीं
देह कसा जातो पिळवटून
—शिणलीं पाउलें वळतीं घरास......
बाजारामधून चालावें सावध
बसट्रामपुढें हुतुतू खेळत, जीवाला जपत
—छे !
कशाचें जीवित ?
आघातामागून सोशीत आघात
झुंजणें- झिजणें-वाळणें-जळणें !
दांत विचकून उगाच हंसणें...आणिक जगणें
मनाच्या मनाला वाटे कीं, नको हें... नको हें... !

—तोंच कोणी देइ थाप पाठीवरी
आणिक पुकारी, " काय कविवर्य ! "

कविवर्य, हो, कविवर्य !
ऐकतां तो शब्द—
सात पाताळांत दबलेला आत्मा
कवीचा तो आत्मा
होकार भरीत
उठे उसळून
—प्रफुल्ल तो आत्मा
शिणल्या मनाला पंखावरी घेत
अनंत भराऱ्या मारी अनंतांत ! !

## अम्लान फुलांनो !

चांदणें होतसां ऐन दुपारीं तुम्ही
जीवनीं माझिया सुरम्यता ओतुनी;
या दिशा कोंदुनी येतां अंधारुनी
तुम्हि निरांजनाची ज्योत होतसां मनीं !

—तटतटा तुटाति या मुळ्या कितीदां, तरी
तरु वठूं न देतां, पुरवोनी जीवन;
वर्षतां अकालीं मेघ—कांपतां मन...
तुम्हि धरितां कैसें छत्र हळुंच कोठुन !

—कृतिवांचुनि जळत्या उरांतल्या भावना
तुमचाच लेउनी साज, शान्त होत ना ?
अन् अन्यायास्तव नयनिं सांठलें कांहीं—
ठिणग्याच होउनी तुम्हांत नाचेल ना ?

—अम्लान फुलांनो ! वेडच तुमचें मला
कां जीव एवढा मजवरि तुम्हि लाविला ?
तुम्हि संगातिं तोंवर—वसंत माझ्यासवें
तुम्हि संगातिं तोंवर—कशास हीं आंसवें ?

# मध्यावरी आलों

मध्यावरी आलों
पोहत पोहत—
पहात शोभा
सरितेची

सवंगडी कांहीं
पुढें पुढें गेले
अन् कांहीं राहिले
कुठें मागें

प्रवाहांत केव्हां—
चढे नवें पाणी,
कुठें कांटा-फणी
बोचताहे !

उरीं मात्र आहे
सांठला आनंद
पैलतीरीं देह
पोंचल्याचा...

मध्यावरी आलों
पोहत—पोहत—

* * *

आतां, मुलाच्या संसारीं
माझी जागा कुठें आहे ?
सूर्य उगवला वरी,
चंद्र रेंगाळत राहे !

आतां नव्या कंकणांचा
कलरव माजघरीं—
आंत नवा आडकित्ता
कातरीताहे सुपारी ! !

नवीं नांवें भांड्यांवरी
नवें तोरण दाराला
नवीं किरणें घरांत
नवा करंडा पेटीला !

लाट अवखळ फुटतां
नित्य नवी खळखळ,
ओली रेती ओलांडीत
वाहे वारा झुळझुळ !

मीच माझ्या साउलींत
आतां मूढपणें उभा,
किनाऱ्याशीं ओठंगल्या
एक पाहतों मी नभा !

आंत आंत कोठें तरी
लाट गंधाची उमटे,
गेला-झिजला चंदन
लावा कपाळाशीं बोटें ! !

## मला आवडे

मला आवडे
बेमुर्वत मन
हुंदडणारें,
अडेल तें तें
कर्वतणारें ! १

मला आवडे
झुलुक सकाळीं
गोंजरणारी
फुग्याफुग्याचा
लेवुन पर्कर,
दिसेल त्याला
मिचकवणारी ! २

मला आवडे
स्तन्यासाठीं
तटतटणाऱ्या
कोमल
कंठामधला टाहो ! ३

मला आवडे
राममंदिरीं—
प्रवचनांत
विरलेली
मूर्ति ;
लटलटणारी,
सीतेसाठीं
पाझरणारी ! ४

मला आवडे
अर्धगुलाबी
रंगावरलें,
उतट, मातलें
उकलाया
उन्मुखलेलें
अनार एक ! ५

जत्रेंतून छान नवा
विटीदांडू मीं आणिला,
एकुलत्या लेकराला !

रंगपट्टे लाल हिरवे
छान दिसती बाळासो,
हिंडे घेऊन उराशीं !

—माता तरणी घरांत
चुलीपुढें धांवे धांवे
अशी लवे—तशी लवे !

बाळ एक कंटाळला ;
धरी, ओढी पदराला
चल आई खेळायाला !

पहिल्यानें आयुष्यांत
आई हातीं घेई दांडू,
म्हणे, विडी कशी मांडूं ?

बाळ शिकवितो डाव
मातामाउली ऐकते,
लाट पाण्याशीं खेळते !

मायलेकरांचा डाव
कसा रंगे अंगणांत,
—बघणारा भाग्यवंत ! !

# चोखामेळ्याची समाधि

[ मंगळवेढें येथें बाजारपेठेंतील चौकांतच लहानसें वृंदावन आहे. तेंच मंगळवेढ्याचें कुसूं बांधतांना हरिरूपीं लीन झालेल्या चोखामेळ्याचें स्मारक होय.]

भर बाजारपेठेंत—
      उभें एक वृंदावन
कालगंगेंत वाहत्या
      येथें तरले पाषाण !

देवनामीं रंगलेली
      कुडी येथें हरपली
ओल्या मातीची पायरी
      देवासाठीं मांडियेली !

कुसूं मंगळवेढ्याचें
      गेलें झिजून, झरून,
एक भगवी पताका
      उभी नांदते अजून.

मार्त मिळाली मातीला,
      स्वर माघारीं राहिला
विटेवरच्या देवाचा
      हार थोडा थरारला !

ऊंस डोंगा, डोंगा परी
      रस नोहे, नोहे डोंगा
दौंडी पिटी चोखामेळा...
      साक्ष आहे जनगंगा !

माझे संसारकरूचे
येथें जुळतात कर
धूळ लावितां कपाळीं
दाटे मनांत लहर !

गेला चोखामेळा संत
आम्हीं काय गावीं गाणीं
माती मिळतां मातींत
अश्रू फुटले पाषाणीं ! !

## तें रितेंच तीर्थस्थान

पाहसी काय रे वळुन
तें रितेंच तीर्थस्थान !
येथेंच नांदले सन्त,
जोडीत देव भगवन्त.
येथेंच ऐकिले मंत्र :
–येथेंच टेकितां माथा
थरथरलें गात्र नि गात्र
गहिवरला कितिदां प्राण...
तें रितेंच तीर्थस्थान

सोडून पायिंचा गुंता
येथेंच कितीदां आलों,
पेटतां एक उदबत्ती
गंधांत न्हाउनी गेलों
येथेंच विसरुनी विश्व
क्षाळियलें अंत:करण
तें रितेंच तीर्थस्थान !

तें तोरण त्या दाराला
अजुनीही लटकत आहे
वाळलीं परंतु पानें
ती दोरी थकली आहे !
थांब रे मन्मना, थोडें
येइल का ऐकूं गान !
तें रितेंच तीर्थस्थान !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 23044 वि: काव्य
क्रमांक 9300 नों दि: 29/3/84

तोडून पाश इवलाले
पंख ते उडोनी गेले,
मागही राहिला नाहीं
आकाश दिसे मोकळें.
ही रीत जगाची आहे
भगवन्ताहि निघुनी जाये;
धरि पदर कोण खेचून ?
तें रितेंच तीर्थस्थान !

रामचंद्र शरयूतीरीं
श्रीकृष्ण वनामाझारीं
श्रीयेशू क्रूस खिळ्यावरि
ज्ञानेश भूमिच्या उदरीं
राहिले नेत्र झाकून...
परतले कोण मागून ?
त रितेंच तीर्थस्थान !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 24064

तो अनंतरूपें नटुन
तुज दाविल अपुली खूण
या तीर्थातच तो राहे
घे तीर्थ, करुनिया नमन.
मी समाधान हें करितों
परि व्याकुळ अंतःकरण...
तें रितेंच तीर्थस्थान !

## आतां लागेल हंसाया

सारीं घरें चिडीचिप
एक जागतो घुमट
दोहीं बाजू उंच झाडें
मध्यें चाकोरीची वाट

ओढ्यावर उठे धुकें
कांपे बाभळीचें झाड
छोट्या मारुतीशेजारीं
स्तब्ध दाढीवाला वड

कोठें तरी वाजे घांट
हाले वशिंड नंदीचें
उसावर दहिंवर
हाले पान एरंडीचें !

नागवेलीच्या गळ्यांत
शेवरीचा मफलर
नार मूळची देखणी
त्यांत थंडी अरुवार...

धारेवर धुणें धुते
भली सासुरवाशीण
केस मोकळे पाठीशीं
ओचा घेतला खोचून !

जागें झालेलें कोकरूं
आपल्याशीं उड्या मारी
आई बघते रोखून
याला काय झालें तरी

—पूर्व दिशेला पेटली
एक शेकोटी सूर्याची
आतां लागेल हंसाया
लेक लाडकी देवाची !

राठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क. ९४०७



REFBK-0009407
REFBK-0009407